**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
**(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय)**

क्र.मऔविम/मावतं विभाग/D09318/२०२०

उद्योग सारथी
मरोळ औद्योगिक क्षेत्र,
महाकाली गुंफा मार्ग,
अंधेरी (पूर्व), मुंबई-९३
दिनांक : 25/11/2020

**परिपत्रक**

विषय : माहिती तंत्रज्ञान उद्यानात वाटप केलेल्या भूखंडाच्या विकासासाठी सह-विकासक (Co-Developer) नेमणेबाबतच्या परिपत्रकास मुदतवाढ देणेबाबत

संदर्भ : १. परिपत्रक क्र.मऔविम/सह मुकाअ(मा/तं)/विधी व मकाज/९४/२००९ दिनांक ११/११/२००९.
२ परिपत्रक क्र.मऔविम/मावतं विभाग/६३४७०/२०१३ दि.२७/०२/२०१३.
३ परिपत्रक क्र.मऔविम/मावतं विभाग/२२१००/२०१३ दि.१८/१२/२०१८.

माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात होत असलेली घसरण, जागतिक, औद्योगिक तसेच आर्थिक मंदी याचा विचार करता विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) मधील माहिती तंत्रज्ञान/माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा (IT/ITES) क्षेत्रातील उद्योजकांना वाटप केलेल्या भूखंडाच्या विकासासाठी प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने तसेच भूखंडाचा विकास शिघ्र गतीने होण्याच्या दृष्टीने उपरोक्त संदर्भिय परिपत्रकान्वये सह विकासक (Co-Developer) नेमण्यासाठी विहित केलेला कालावधी संपुष्टात आल्याने व या क्षेत्रातील उद्योजकाकडून सह-विकासक नेमण्यास परवानगी देण्यासंबधाने प्राप्त झालेली निवेदने विचारात घेता, सह-विकासक नेमण्याचा कालावधी वाढविण्याबाबतचा विषय महामंडळाच्या संचालक मंडळाच्या दिनांक १६/१०/२०२० रोजी झालेल्या ३८७ व्या सभेत सादर करण्यात आला होता. सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन ठराव क्रमांक ६११६ पारीत करण्यात आला. सदर ठरावाचे अनुषंगाने विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) मधील माहिती तंत्रज्ञान / माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा (IT/ITES) क्षेत्रातील उद्योजकांना भूखंड विकासासाठी प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने तसेच त्यांना वाटप केलेल्या भूखंडाचा विकास शिघ्र गतीने होण्याच्या दृष्टीने सह-विकासक (Co-Developer) ची प्रकरणे गुणवत्ता निहाय तपासून महामंडळाचे उपरोक्त संदर्भिय दि.११/११/२००९ च्या परिपत्रकात नमूद केलेल्या अटी व शर्तीवर दिनांक १८/१२/२०१८ च्या परिपत्रकास दि.०१/०४/२०२० ते दि.३१/०३/२०२२ असा पुढे दोन वर्षाच्या कालावधीकरीता मा.अध्यक्ष यांचे मंजूरीने सह-विकासक (Co-Developer) नेमण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदरहु परिपत्रक मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

सह मुख्य कार्यकारी अधिकारी (मा/तं)
मऔविम, मुंबई-९३

प्रति,
१. सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
२. अतिरिक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे/नांदेड/नागपूर.
३. सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम.
४. सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम.
५. सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम.
६. सह मुख्य/उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/पुणे/औरंगाबाद/नागपूर.

midcconsultants.in
For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in

७. महाव्यवस्थापक(भूमी)/महाव्यवस्थापक(भूसंपादन)/व्यवस्थापक(भूमी१/२)/मऔविम, मुंबई.
८. प्रशासकीय अधिकारी, मऔविम, मुंबई.
९. व्यवस्थापक (भूसंपादन १/२) मऔविम, मुंबई.
१०. जनसंपर्क अधिकारी, मऔविम, मुंबई.
११. सर्व क्षेत्र व्यवस्थापक, मऔविम, मुंबई.
१२. म.औ.वि.महामंडळाचे सर्व संचालक.
१३. सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केन्द्र.
१४. सर्व औद्योगिक संघटना.
१५. मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती/मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ/जागतिक व्यापार केन्द्र (डब्ल्यु.टी.सी), कफ परेड, मुंबई.

midcconsultants.in

For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
**(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय)**

क्र.मऔविम/मावतं विभाग/D 09334/२०२०

उद्योग सारथी
मरोळ औद्योगिक क्षेत्र,
महाकाली गुंफा मार्ग,
अंधेरी (पूर्व), मुंबई-९३
दिनांक : 25/11/2020

## परिपत्रक

विषय : माहिती तंत्रज्ञान उद्यानामधील भूखंड खाजगी विकासकामार्फत विकसित केलेल्या माहिती तंत्रज्ञान इमारतीमधील गाळा हस्तांतरणाकरीता मुदतवाढ देणेबाबत.

संदर्भ : परिपत्रक क्र.मऔविम/मावतं विभाग/डी८५६६१/२०१५ दि.३०/१२/२०१५.

माहिती तंत्रज्ञान उदयानात आणि माहिती तंत्रज्ञान विशेष आर्थिक क्षेत्रातील तसेच औद्योगिक क्षेत्रातील भूखंडावर उभारलेल्या माहिती तंत्रज्ञान उदयानातील इमारतीमधील जागेचे पहिले हस्तांतरणासाठी वरील संदर्भिय परिपत्रकामधील धोरणानुसार कोणतेही शुल्क आकारण्यात येत नाही. सदर सवलत ही परिपत्रकाच्या दिनांकापासून पाच वर्षापर्यत म्हणजेच २०/०७/२०१५ ते १९/०७/२०२० पर्यत अस्तित्वात होती. परंतु माहिती तत्रज्ञान उद्यानामधील भूखंडधारक माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील सध्याची घसरण तसेच जागतिक मंदी इत्यादीमुळे संकटत सापडलेल्या माहिती तंत्रज्ञान उद्योगाला प्रोत्साहीत करणेकरीता उद्योजकांनी बांधलेल्या इमारतीमधील गाळयांच्या पहिल्या हस्तांतरणाचा कालावधी वाढविण्याची आवश्यकता निर्माण झाल्याने त्याबाबतचा विषय दिनांक १६/१०/२०२० रोजीच्या संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये सादर करण्यात आला होता. सदर विषयावर सविस्तर चर्चा होउन ठराव क्र ६११७ पारीत करण्यात आला आहे.

सदर ठरावानुसार माहिती तंत्रज्ञान उदयान आणि माहिती तंत्रज्ञान विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) तसेच औद्योगिक भूखंडाचे माहिती तंत्रज्ञान भूखंडामध्ये रुपांतर करुन उभारलेल्या माहिती तंत्रज्ञान इमारतीमधील गाळा हस्तांतरणाकरीता महामंडळाच्या दिनांक २७/१०/२००९ च्या परिपत्रकानुसार निर्गमित केलेल्या धोरणास अनुसरुन माहिती तंत्रज्ञान इमारतीमधील युनिट / गाळे यांच्या पहिल्या हस्तांतरणाकरीता यापूर्वी निर्गमित केलेले परिपत्रक दिनांक ३०/१२/२०१५ या परिपत्रकास पुढील पाच वर्ष म्हणजेच दि.२०/०७/२०२० दि. १९/०७/२०२५ पर्यत विनाशुल्क हस्तांतरणाकरीता मुदतवाढ देणेत येत आहे.

सदरहु परिपत्रक मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

सह मुख्य कार्यकारी अधिकारी (मा/तं)
मऔविम, मुंबई-९३

प्रति,

१. सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
२. अतिरिक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे/नांदेड/नागपूर.
३. सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम.
४. सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम.
५. सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम.
६. सह मुख्य/उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/पुणे/औरंगाबाद/नागपूर.
७. महाव्यवस्थापक(भूमी)/महाव्यवस्थापक(भूसंपादन)/व्यवस्थापक(भूमी१/२)/मऔविम, मुंबई.

midcconsultants.in
For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in

८. प्रशासकीय अधिकारी, मऔविम, मुंबई.
९. व्यवस्थापक (भूसंपादन १/२) मऔविम, मुंबई.
१०. जनसंपर्क अधिकारी, मऔविम, मुंबई.
११. सर्व क्षेत्र व्यवस्थापक, मऔविम, मुंबई.
१२. म.औ.वि.महामंडळाचे सर्व संचालक.
१३. सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केन्द्र.
१४. सर्व औद्योगिक संघटना.
१५. मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती/मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ/जागतिक व्यापार केन्द्र (डब्ल्यु.टी.सी), कफ परेड, मुंबई.

midcconsultants.in

For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in